# क्विक Update



## विद्यार्थ्यांनी घेतली आधुनिक शेतीची माहिती

**कळंब :** येथील शिवशक्ती विद्यालयाच्या वर्ग ७ व ८ च्या विद्यार्थ्यांसाठी यवतमाळ येथील नर्सरीमध्ये क्षेत्रभेट उपक्रम राबविण्यात आला. एस. एस. गाजलेकर आणि अजित काळे यांच्या मार्गदर्शनात हा उपक्रम राबविला गेला. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी रोपवाटिका म्हणजे काय, विविध रोपांच्या जाती, रोपवाटिका उद्योगासाठी लागणारा खर्च आदी बाबींची माहिती घेतली. तसेच मातीशिवाय पिके किंवा वनस्पती वाढवण्याची आधुनिक शेती पद्धत या विषयांबाबत माहिती उपलब्ध केली.

## नेताजी चौकात अपघाताची भीती

**यवतमाळ :** येथील नेताजी चौक परिसरात अनियंत्रित वाहतुकीमुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. तसेच सिमेंट रस्त्यावर डांबरी रस्त्याचे पॅचेस टाकले असल्याने हा धोका आणखी वाढला आहे. या ठिकाणचे खड्डे चुकविण्याच्या प्रयत्नात अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यावर उपाययोजनांची मागणी आहे.

# साडेतीन हजार विद्यार्थ्यांची जबाबदारी १८० शिक्षकांवर

### सांगा शिकवायचे कसे? विनाअनुदानित शाळांकडे पालकांचा कल


लोकमत न्यूज नेटवर्क

**मारेगाव :** ग्रामीण भागात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आहे. मात्र शिक्षकांची रोडावलेली संख्या यामुळे गावात वर्ग आहे, पण शिक्षक नाहीत. त्यामुळे वर्ग ८ आणि शिक्षक २ असे चित्र बऱ्याच ठिकाणी पाहायला मिळते. मारेगाव तालुक्यातील तीन हजार ७५७ विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी केवळ १८० शिक्षक आहेत. त्यामुळे एवढ्या मोठ्या संख्येतील विद्यार्थ्यांना आम्ही शिकवायचे कसे, असा शिक्षकांचा सवाल आहे.

सरकारी शाळांतून विद्यार्थी संख्या रोडावली आहे. तर दुसरीकडे विनाअनुदानित शाळांमध्ये विद्यार्थी पटसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी झाले आहे. शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर सुधारले आहे. डिजिटल सुविधा वाढल्या आहेत, अशी माहिती शिक्षण विभाग सांगत असला तरी वास्तव प्रत्यक्षात वेगळं आहे. आज तालुक्यात एकूण २७३ शिक्षकांची गरज असताना १८० शिक्षकांवर गाडा हाकला जात आहे. नुकतेच ४१ शिक्षक तालुक्याला प्राप्त झाले. आणखी ४३ शिक्षकांची पदे रिक्त आहेत. गेल्या काही वर्षात तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधून तब्बल ५० टक्क्यांपेक्षा जास्त विद्यार्थी कमी झाले असल्याचे चित्र मारेगाव तालुक्यात आहे.

### शाळाबाह्य कामाचेही ओझे

**शिक्षण व्यवस्थेतील बदलाने शिक्षक होरपळून निघत असताना शिक्षकावर शाळा बाह्य कामे सोपवली जात आहे. त्यामुळे अध्यापनाकडे दुर्लक्ष होत आहे. परिणामी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे कठीण झाले आहे. आज विद्यार्थी पुढे सरकत असला तरी गुणवत्तेच्या बाबतीत खूप मागासलेला असल्याचे दिसून येते.**



### २०%

आज तालुक्यातील २० पेक्षा जास्त शाळांची पटसंख्या २० विद्यार्थ्यांपेक्षा कमी आहे. उच्च प्राथमिक शाळा तालुक्यात नावालाच उरल्या आहेत. असे असले तरी तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद शाळा डिजिटल झाल्या आहेत. हे सर्व पाहिल्यावर तालुक्यात खरोखर शिक्षण सुधारत आहे का, की केवळ शिक्षणाच्या आकडेवारीत सुधारणा पाहत आहोत? असा प्रश्न निर्माण होतो.

### शिक्षकांचीही कमतरता

तालुक्याला नुकतेच ४१ नवीन शिक्षक मिळूनही अजूनही ४३ शिक्षकांची आवश्यकता आहे. आज ग्रामीण भागातील जिल्हा परिषद, अनुदानित माध्यमिक शाळांत वर्ग आहेत, विद्यार्थी आहेत. मात्र पुरेशी विद्यार्थी संख्या नसल्याने शिक्षकांची संख्या कमी आहे. बऱ्याच ठिकाणी वर्ग ५ आणि शिक्षक १ तर काही ठिकाणी वर्ग ८ आणि शिक्षक २ अशी स्थिती आहे.

### वर्गानुसार शिक्षक द्या

खेड्यातील मुले शहरांतील खाजगी विनाअनुदानित शाळांकडे वळल्याने ग्रामीण भागात वर्गवार विद्यार्थी संख्या रोडावली आहे. ग्रामीण भागातील शिक्षणाचा पाया खिळखिळा झाला आहे. त्यामुळे ग्रामीण भागात शिक्षकांची नियुक्ती विद्यार्थी पटसंख्येवर नाही तर वर्गावर करण्याची गरज आहे.

“

आज शिक्षकांच्या अपुऱ्या संख्येमुळे ग्रामीण भागातील शिक्षणाची गुणवत्ता खालावली आहे. ग्रामीण पालकांचा गावातील शाळेवरील विश्वास कमी झाला आहे. जिल्हा परिषद शाळांचे गतवैभव परत मिळवायचे असेल तर वर्गावर आधारित शिक्षकांची गरज आहे.

**निलेश गाडगे,** शिक्षण अभ्यासक.

## लाडखेड परिसरात विजेचा खेळखंडोबा; नागरिक झाले हैराण

लोकमत न्यूज नेटवर्क

**लाडखेड :** वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष नागरिकांना चांगलेच महागात पडत आहे. परिसरातील २५ गावांमध्ये तासन् तास वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक, शेतकरी त्रस्त झाले आहेत. कमकुवत आणि जुन्या स्वरूपातील डीपी आणि मेंटेनन्ससाठी मोठी तरतूद असूनही फ्यूज उपलब्ध नसण्याच्या समस्येपासून उपेक्षा आहे.

अभियंता आणि कर्मचाऱ्यांची मुख्यालयी उपस्थिती नसणे ही सामान्य बाब झाली आहे. लाइनमध्ये बिघाड झाला तर तासन् तास वीजपुरवठा बंद राहतो. सहाय्यक अभियंता वीजसंबंधीच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप आहे. कर्मचाऱ्यांच्या मनमानीमुळे लाडखेड आणि परिसरातील वीज वितरण व्यवस्थेतून गैरसोय वाढली आहे.

शेतकऱ्यांना स्वतःच जीव धोक्यात घालून लाईनवर काम करावे लागत असल्याने ते प्रचंड त्रस्त आहेत. डीपीच्या देखभालीतून लाखो रुपये खर्च होतात परंतु फ्यूज बसविण्यात काल्पनिक कायम आहेत. नागरिकांनी या गंभीर बाबीकडे वरिष्ठांनी तातडीने लक्ष देण्याची विनंती केली असून, सुधारणा व्हावी अशी मागणी केली आहे.

वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने नागरिकांनी केलेल्या तक्रारीकडेही संबंधित वीज अधिकारी, कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला जात आहे. कंपनीच्या वरिष्ठांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी आहे.

# फोटो Stories



## नगरपरिषद शाळेत 'पुस्तक हंडी' उपक्रम

**यवतमाळ :** येथील नगरपरिषद संजय गांधी शाळा क्रमांक १८ येथे आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन आणि श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी 'पुस्तक हंडी' उपक्रम राबविण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका ज्योती सावळकर होत्या. प्रमुख पाहुण्या नगरसेविका व विरोधी पक्षनेत्या वैशालीताई सवाई, नगरसेवक विशाल पावडे, प्रशासन अधिकारी डॉ. विनोद डवले, छोटू सवाई आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी राधाकृष्ण वेशभूषा, समूहनृत्य व दहीहंडी फोडण्याच्या उपक्रमात सहभाग घेतला. दुपारच्या सत्रात विद्यार्थ्यांनी 'पुस्तक हंडी'तील विविध पुस्तकांचे वाचन करून वाचन संस्कृतीचा संदेश दिला. सूत्रसंचालन शीतल मनवर, आभार शेख अहमद यांनी मानले.



## विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक मूर्ती बनवण्याचे तंत्र

**सोनखास :** राष्ट्रीय अभियांत्रिकी दिनाचे औचित्य साधून सोनखास येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी गावातील मूर्तिकार तुळशीराम ठाकरे यांची भेट घेतली. त्यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक मूर्ती बनविण्याचे तंत्र सांगितले. कोणतेही व्यावसायिक किंवा तांत्रिक शिक्षण न घेता उपजत कलागुणांच्या आणि आत्मविश्वासाच्या जोरावर मूर्तिकार ठाकरे हे अत्यंत आकर्षक आणि पूर्णपणे पर्यावरणपूरक मातीच्या मूर्ती साकारतात. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी तुळशीराम ठाकरे यांच्याकडून मातीच्या मूर्ती बनवण्याची कला, मातीची निवड, मूर्तीला आकार देण्याची पद्धत आणि पर्यावरणपूरक मूर्तींचे महत्त्व याबद्दल सविस्तर माहिती जाणून घेतली. मुख्याध्यापक अजित नहार, मनोज लांजेवार, भावना पानगंटीवार, सरोजबाला गवई आदी शिक्षक व विद्यार्थ्यांनी ठाकरे यांच्या या कलाकौशल्याविषयी जाणून घेतले.

## जोडमोहा येथे सुदाम विद्यालयात उपक्रम

**जोडमोहा :** कळंब तालुक्यातील जोडमोहा येथील सुदाम विद्यालयात शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यामध्ये वर्ग नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकाच्या भूमिकेत वर्ग सहा ते दहामध्ये गणित, इंग्रजी, इतिहास, भूगोल, मराठी आदी विषयांच्या तासिका घेतल्या. याप्रसंगी स्वयंशासन उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यासाठी विद्यार्थ्यांना शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

# आर्णी तालुक्यात १९ गावांत 'एक गाव एक गणपती'

लोकमत न्यूज नेटवर्क

**आर्णी :** तालुक्यात यावर्षी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रशासन आणि पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे. तालुक्यात एकूण १६० गणपतींची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली असून, त्यापैकी आर्णी शहरात २८ तर ग्रामीण भागात १३२ गणपतींची स्थापना करण्यात आली आहे. विशेष म्हणजे तालुक्यातील १९ गावांनी 'एक गाव, एक गणपती' हा उपक्रम राबविला आहे.

गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी आर्णी पोलीस ठाण्याच्या स्तरावरही विशेष नियोजन करण्यात आले आहे. पोलीस ठाण्यात सध्या ७ अधिकारी आणि ५२ कर्मचारी कार्यरत असून गणेशोत्सवाच्या बंदोबस्तासाठी बाहेरगावाहून १ अधिकारी, १० अंमलदार आणि ३५ होमगार्ड अतिरिक्त स्वरूपात दाखल झाले आहेत. गणेश विसर्जनाच्या मिरवणुका तसेच गर्दीच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार असून, नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. गणेश मंडळांनी मिरवणुकीदरम्यान शिस्त, वाहतुकीचे नियम आणि ध्वनीप्रदूषणासंबंधीच्या नियमांचे पालन करणे अपेक्षित आहे.

### मिरवणूक मार्गाची डागडुजी आवश्यक

गणेशोत्सवाच्या काळात शहरातील विविध भागांतून मिरवणुका निघणार असल्याने नगर परिषदेने रस्त्यावरील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्याबरोबरच मिरवणूक मार्गावरील खड्डे व खराब रस्त्यांची तातडीने डागडुजी करणे गरजेचे आहे. मिरवणूक मार्गावर अडथळे निर्माण करणारे अतिक्रमण, वाहने व इतर अडथळे दूर करण्याचीही आवश्यकता नागरिकांतून व्यक्त होत आहे. दरम्यान, गणेशोत्सवाच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता सूचनांचे पालन करावे. गणेश मंडळांनी सामाजिक सलोखा आणि शांतता कायम ठेवत उत्सव साजरा करावा. असे आवाहन केले आहे.



# इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये पूर्ण समर्पणाची गरज

### महेश मोकलकर : अभियंता दिन कार्यक्रमात प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**यवतमाळ :** अभियंता दिन सर्वत्र उत्साहाने साजरा होत असताना यवतमाळ येथील असोसिएशन ऑफ सिव्हिल इंजिनिअर्स, यवतमाळच्या वतीने विविध कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमाच्या वेळी प्रमुख वक्ते म्हणून संबोधित करताना अभियंता महेश मोकलकर यांनी इन्फ्रास्ट्रक्चरच्या महत्त्वावर भर दिला. ते म्हणाले, देशाच्या विकासात इन्फ्रास्ट्रक्चरचे महत्त्व अतुलनीय आहे. त्यामुळे या क्षेत्रात कार्य करताना पूर्ण समर्पण, प्रामाणिकपणा आणि जबाबदारीच्या भावनेने कार्य करणे अनिवार्य आहे, असे ते म्हणाले.

कार्यक्रमावेळी असोसिएशन ऑफ सिव्हिल इंजिनिअर्स, यवतमाळचे अध्यक्ष चेतन पळसोकर यांनी संघटना अधिक मजबूत करण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले. तसेच, आपल्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा उपयोग एक सक्षम, सुरक्षित आणि शाश्वत समाज निर्माण करण्यासाठी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सकाळी यवतमाळ येथील आरएसके ग्राऊंडवर क्रिकेट सामने घेण्यात आले. लोहारा येथील मैथिली नगर परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम झाला. तेजस्विनी छात्रावास, वडगाव रोड येथे जाऊन विद्यार्थिनींना आवश्यक वस्तूंच्या स्वरूपात मदतीचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी मुख्य कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी अभियंता विनायक कशाळकर व संजय ठाकरे यांना जीवन गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. संचालन मिलिंद वेळूकर, पुरस्काराचे वाचन अर्पिता देशपांडे यांनी केले. आभार प्रवीण खांदवे यांनी मानले. यशस्वितेसाठी उपाध्यक्ष अतुल देशपांडे, कोषाध्यक्ष संकल्प डांगोरे, वसंत गजभिये, चंद्रशेखर मुळे, तरुण हिंडोचा आदींनी पुढाकार घेतला.


## सार्वजनिक बांधकाम कर्मचारी सहकारी पतसंस्था म. यवतमाळ जि.र.नं. १५१

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

सर्व सन्माननिय सभासदांना कळविण्यात येते की, सन २०२५-२६ या सालाची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २०/०९/२०२६ रोज रविवारला हॉटेल ड्रॅगन, प्रतिमा पार्क समोर पिंपळगाव जवळ यवतमाळ येथे दु. ठिक १२:०० वाजता अध्यक्ष श्री. गणेश लक्ष्मणराव चवरे यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. कृपया सभेस उपस्थित राहावे, ही विनंती.

**धनराज लक्ष्मणराव मोहोड**
**(मा. सचिव)**


मस्ट READ

# यादीत समावेशाची आर्त हाक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नेर :** आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या नेर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पदरी यंदाही निराशाच पडली आहे. पावसाचे अत्यल्प प्रमाण, खरीप पिकांचे झालेले नुकसान आणि वाढती आर्थिक कोंडी यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. अशा परिस्थितीत नेर तालुक्याचा दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत समावेश करावा, अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष नीलेश राठोड यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे.

**नेर तालुक्यात अत्यल्प पावसामुळे शेती पिकाचे नुकसान, शेतकऱ्यांची झाली आर्थिक कोंडी**

शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने शेतात पेरणी केली. बियाणे, खत, औषधांसाठी कर्ज काढून उभे केलेले पीक पावसाअभावी संकटात सापडले. प्रत्यक्ष परिस्थितीचा विचार करून नेरचा समावेश दुष्काळग्रस्त यादीत करणे आवश्यक असल्याचे राठोड यांनी म्हटले आहे.

दुष्काळग्रस्त तालुक्यांना शासनाकडून मिळणाऱ्या सवलती, मदत आणि विविध योजनांचा लाभ नेर तालुक्यातील शेतकऱ्यांनाही मिळावा, यासाठी तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. शेतकरी संकटात असताना कागदावरील निकषांपेक्षा त्यांच्या शेतातील वास्तव पाहणे गरजेचे आहे. नेरच्या शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून शासनाने त्यांना दिलासा द्यावा. नेर तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करण्याचा सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती नीलेश राठोड यांनी केली.

## दारव्हा येथे क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे निवेदन

**दारव्हा :** पावसातील दीर्घ खंडामुळे यवतमाळ जिल्ह्यातील कापूस व सोयाबीन पिकांचे मोठे नुकसान झाले असून, तातडीने जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची मागणी क्रांतिकारी शेतकरी संघटनेने तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनात केली आहे. तसेच एनडीआरएफचे मदतीचे निकष सध्याच्या वाढलेल्या उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत तुटपुंजे आहेत. त्यामुळे हे निकष बाजूला ठेवून बाधित शेतकऱ्यांना प्रति हेक्टर एक लाख रुपये विशेष आर्थिक मदत द्यावी, आदी मागण्या संघटनेने केल्या. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रशांत सुरसकर, प्रेमसिंग राठोड, शाहेद अहमद शेख, मो. वसीउल्ला, सूर्यकांत सुरसकर, सरबर खान शेर खान, मधुकर राठोड, प्रकाश ठाकरे, प्रदीप वानखडे उपस्थित होते.

## बाभूळगाव तहसीलदारांकडे मांडले विविध प्रश्न

**बाभूळगाव :** अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने मुख्यमंत्र्यांना पाठविण्यासाठी येथील तहसीलदार मीरा पागोरे यांना निवेदन दिले. तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा, शेतमालाला नवा हमीभाव जाहीर करावा, लाडक्या बहिणीच्या केवायसीकरिता मुदत वाढवून द्यावी, बेंबळा नदीचे रुंदीकरण व खोलीकरण करावे, नदीकाठावरील बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई तातडीने मिळावी आदी मागण्या केल्या आहे. निवेदनावर दीपक माहुरे, विठ्ठल मडावी, गिरधर काळे, गुलाब उमरतकर, पांडुरंग भुसारी, एम. जी. गावंडे, रामकृष्ण राऊत, रफीओदिन काझी, राजेंद्र तायडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## ...तर आंदोलन करण्याचा दिला इशारा

**यवतमाळ :** जिल्ह्यात पावसाने दीर्घ खंड दिल्यामुळे संपूर्ण खरीप हंगाम धोक्यात आला आहे. या गंभीर परिस्थितीत जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी येथील भाई अमन यांनी केली आहे. शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत देण्यात यावी, असे त्यांनी म्हटले आहे. सोयाबीन, कापूस, तूर, मूग आणि उडीद या प्रमुख खरीप पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर, बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. २ ऑक्टोबरपर्यंत कोरडा दुष्काळ जाहीर न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा भाई अमन यांनी दिला.


**बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda**

**झोनल तणावग्रस्त मत्ता वसुली शाखा, 2 रा माळा, जेडीए बिल्डिंग, ब्लॉक 10, सिव्हिक सेंटर, मधातल, जबलपूर-482002 (म.प्र.)**
फोन: 0761-2480150, ई-मेल: armbja@bankofbaroda.bank.in

**ई-लिलाव विक्री सूचना**

**अचल संपत्तींच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

परिशिष्ट- IV- ए (नियम ६ (२) व ८ (६) चे परंतुक पाहा)

**प्रतिभूतिहित (प्रवर्तन) नियमावली, २००२ च्या नियम ६ (२) व ८ (६) च्या परंतुकासह वाचल्या जाणाऱ्या वित्तीय मत्तांचे प्रतिभूतीकरण आणि पुनर्स्थापना तसेच प्रतिभूतिहिताचे प्रवर्तन अधिनियम, २००२ च्या अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.**

सर्वसामान्य जनता तसेच विशेषतः कर्जदार, गहाणदार आणि हमीदार यांना एतद्द्वारा नोटीस देण्यात येते की खालील वर्णनीत अचल संपत्ती जी प्रतिभूति धनको (क्रेडिटर)कडे गहाण/प्रभारित आहे, त्याचा ताबा बँक ऑफ बडोदा, प्रतिभूती धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे घेण्यात आला असून, ही संपत्ती ''**जसे आहे जेथे आहे**'', ''**जसे आहे जे आहे**'', **तेथे जे काही आहे**'' आणि ''**कायदेशीर अवलंबाविना**'' या आधारावर खालील निर्देशित खात्यांमधील थकीत राशी (देणीं)च्या वसुलीकरिता विकण्यात येईल. कर्जदार/गहाणदार/हमीदार/प्रतिभूती मत्ता/देणी/राखीव मूल्य/ई-लिलावाची तारीख व वेळ आणि बयाणा राशी(ईएमडी) आणि बोली वृद्धी राशीचे विवरण खालील नमूद करण्यात येत आहे-

| अ. क्र. | कर्जदार/हमीदार/गहाणकारांचे नाव व पत्ता | अचल संपत्तीचे विवरण कोणत्याही ज्ञात भार असल्यास त्यासहित आणि संपत्ती मालकाचे नाव | एकूण देणी (२६.११.२०१७ रोजीनुसार) | ई-लिलावाची तारीख व वेळ | राखीव मूल्य / बयाणा राशी / बोली वृद्धी राशी | ताब्याची स्थिती (अर्थापन्न/प्रत्यक्ष) | संपत्ती निरीक्षणाची तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **१. मे. अरिहंत कोल सेल्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड(कर्जदार),** पत्ताः धनश्री व्हिला, ई-४/१०८, भगिरा अपार्टमेंटच्या समोर, अरेरा कॉलनी, भोपाल(म.प्र.) -४६२०१६ **२. मे.अरिहंत कोल सेल्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (कर्जदार),** पत्ताः ३०४, तनिष्का डब्ल्यू.ई. हायवे, कांदिवली पूर्व, मुंबई(म.रा.)-४००१०१ **३. श्रीमती निर्मला जैन पत्नी श्री अरुण जैन(संचालक व हमीदार),** पत्ताः ई-७/४३५, अरेरा कॉलनी, भोपाल(म.प्र.)-४६२०१६ **४. कल्पना जैन पत्नी श्री अनिल कुमार जैन(संचालक व हमीदार),** पत्ताः धनश्री व्हिला, ई-४/१०८, भगिरा अपार्टमेंटच्या समोर, अरेरा कॉलनी, भोपाल(म.प्र.) -४६२०१६ **५. श्री अनिल कुमार जैन वल्द श्री कपूर चंद जैन(संचालक व हमीदार),** पत्ताः धनश्री व्हिला, ई-४/१०८, भगिरा अपार्टमेंटच्या समोर, अरेरा कॉलनी, भोपाल(म.प्र.) -४६२०१६ **६. श्री कपूर चंद जैन वल्द दिवंगत श्री मुन्ना लाल जैन (मृत संचालक व हमीदार)** त्यांच्या कायदेशीर वारसाच्या मार्फत अर्थात श्री अरुण जैन (मुलगा), श्री अनिल जैन (मुलगा), श्री अरविंद जैन (मुलगा) आणि श्री मनोज जैन (मुलगा), पत्ताः धनश्री व्हिला, ई-४/१०८, भगिरा अपार्टमेंटच्या समोर, अरेरा कॉलनी, भोपाल(म.प्र.)-४६२०१६ **७. श्रीमती धनश्री बाई जैन पत्नी श्री कपूर चंद जैन (मृत हमीदार)** त्यांच्या कायदेशीर वारसाच्या मार्फत अर्थात श्री अरुण जैन (मुलगा), श्री अनिल जैन (मुलगा), श्री अरविंद जैन (मुलगा) आणि श्री मनोज जैन (मुलगा), पत्ताः धनश्री व्हिला, ई-४/१०८, भगिरा अपार्टमेंटच्या समोर, अरेरा कॉलनी, भोपाल(म.प्र.)-४६२०१६ **८. श्री अरुण जैन वल्द श्री कपूर चंद जैन(हमीदार),** पत्ताः ई-७/४३५, अरेरा कॉलनी, भोपाल(म.प्र.)- ४६२०१६ **९. श्री अंकित जैन वल्द श्री अनिल कुमार जैन(हमीदार),** पत्ताः धनश्री व्हिला, ई-४/१०८, भगिरा अपार्टमेंटच्या समोर, अरेरा कॉलनी, भोपाल(म.प्र.)-४६२०१६ | १. सर्व्हे नं. १९/१, गाव चिखलगाव, तालुका वणी, जिल्हा यवतमाळ (म.रा.) येथे स्थित परिवर्तित जमीन, आराजी क्षेत्रफळ २.३४ हेक्टर, मे. अरिहंत कोल सेल्स इंडिया प्रा.लि.च्या नावे. सीमा : पूर्व- शेत सर्व्हे नं. २०, पश्चिम- शेत सर्व्हे नं. १८/५, उत्तर- शेत सर्व्हे नं. १८ व २१, दक्षिण-शेत सर्व्हे नं. १९/२. २. सर्व्हे नं. १८/५, गाव चिखलगाव, तालुका- वणी, जिल्हा यवतमाळ (म.रा.) येथे स्थित परिवर्तित जमीन, आराजी क्षेत्रफळ ०.३७ हेक्टर, मे. अरिहंत कोल सेल्स इंडिया प्रा.लि.च्या नावे. सीमा : पूर्व- शेत सर्व्हे नं. १९/३, पश्चिम- कळमना रोड, उत्तर- शेत सर्व्हे नं. १८, दक्षिण- शेत सर्व्हे नं. १९. | रु. १,१२,५४,७६,०२०.७२ + व्याज व आकार | १३-१०-२०२६ दु. २.०० ते सायं. ६.०० | रु. २९७००००/- / रु. २९७००००/- / रु. २०००००/- | प्रत्यक्ष | ०६-१०-२०२६ वेळः स. ११.०० ते सायं. ४.०० |
| | | १. निवासी संपत्ती फ्लॅट नं. ३०३, तिसरा मजला, राधा क्रिष्णा अपार्टमेंट, इदगाह हिल्स, सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूलजवळ, वॉर्ड नं. ९, भोपाळ (फ्लॅटचे क्षेत्रफळ- ७३.२३ चौ. मि.) श्री अनिल कुमार जैन वल्द श्री कपूर चंद जैन यांचे नावे. सीमाः पूर्व- रोड, पश्चिम- कॉरिडोर, उत्तर- फ्लॅट नं. ३०२, दक्षिण- प्लॉट नं. ११६ | रु. ११२,५४,७६,०२०.७२ + व्याज व आकार | १३-१०-२०२६ दु. २.०० ते सायं. ६.०० | रु. १२६००००/- / रु. १२६०००/- / रु. २०००००/- | प्रत्यक्ष | ०६-१०-२०२६ वेळः स. ११.०० ते सायं. ४.०० |

**सरफाईसी ॲक्ट, २००२ च्या रुल ८ (६) अंतर्गत वैधानिक १५ दिवसांची विक्री सूचना**

विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया वेबसाइट लिंक : https://www.bankofbaroda.in/ e-auction व ऑनलाइन ऑक्शन पोर्टल Baanknet.com मध्ये पाहावे / भेट द्यावी. तसेच संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्यांसोबत संपर्क करू शकतील फोन नं. ०७६१-२४८०१५०, मोबा.नं. ९८१०५५३७७५.

**स्थान : जबलपूर, दिनांक : १८.०९.२०२६** **अधिकृत अधिकारी, बँक ऑफ बडोदा**